रँग्लरीचे दिवस

जयंत नारळीकर

ऑक्टोबरच्या सुरुवातीला नव्या विद्यार्थ्यांच्या रांगा वेगवेगळ्या ऑफिसांपुढे दिसू लागल्या. कॉलेजची फी भरणे, ट्यूटरकडे हजेरी लावणे, अभ्यास-संचालकांकडून अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन घेणे... विविध चक्रांतून भांबावलेल्या चेहऱ्यांची ही मंडळी–त्यांना 'ताजी माणसे' (Freshmen) म्हणत–जात असताना आम्ही वर्ष पुरी केलेली 'अनुभवी' माणसे त्यांच्याकडे तटस्थतेने पाहत होतो. आणि त्यांच्यापैकी कुणी काही माहिती विचारल्यास सर्वज्ञतेचा आव आणून पुरवत होतो.''मिस्टर वॉल्टर्सचं ऑफिस?''...''असे एक मजला चढून जा, उजवीकडचं पहिलं दार.'' किंवा ''गाउन घ्यायचं अगदी जवळचं दुकान ना? ह्याच रस्त्यानं पुढं जा. एका फर्लांगावर जेम्स नीलची पाटी डावीकडे दिसेल.''–वगैरे वगैरे...कारण आता आम्ही केंब्रिजमध्ये जुने झालो होतो; नवे असे काही राहिले नव्हते.

पण मलाही एक बदल जाणवला : गेल्या वर्षीचे अभ्यास-संचालक रेमंड लिटिल्टनऐवजी आता बिल येट्स आले होते. 'ट्रायपॉस पार्ट दोन' ही महत्त्वाची परीक्षा. आपण रँग्लर होणार की नाही ते ह्या वर्षी ठरणार म्हणून मला चिंता होती की, आपल्याला गेल्या वर्षीसारखे चांगले सुपरव्हायजर मिळतील का? येट्सनाही तीच काळजी होती, कारण सुपरव्हायजर नेमण्यासाठी त्यांनी इम्मॅन्युएल कॉलेजचे डॉक्टर लॅपवुड यांच्याकडे मला पाठवले. लॅपवुडनी मला प्रायोजित गणितासाठी इम्मॅन्युएलचे डॉक्टर स्क्रीटन यांच्याकडे तर शुद्ध गणितासाठी सिड्ने ससेक्स कॉलेजच्या मिस्टर कार्टरकडे पाठवले. माझा सहविद्यार्थी होता सिड्ने ससेक्सचा जोन्स. हा गेल्या वर्षी प्रीलिममध्ये नवव्या क्रमाकांने पास झाला होता.

ऑक्स्फर्ड आणि केंब्रिज ही विद्यापीठे स्वत:ला इतर विद्यापीठांपेक्षा वेगळी लेखतात, याचे एक गमतीदार प्रत्यंतर मला केंब्रिज युनिव्हर्सिटी रिपोर्टर चाळताना आले होते. 'रिपोर्टर' हे विद्यापीठाचे समाचारपत्र. विद्यापीठातल्या अधिकृत घडामोडींची माहिती, अधिनियम, वटहुकूम, परीक्षांचे निकाल आदींसाठी 'रिपोर्टर'ची प्रत आठवड्यातून एकदा प्रकाशित होते. प्रत्येक सत्राच्या सुरुवातीला रिपोर्टरमध्ये सर्व लेक्चर्सची वेळापत्रके असतात. त्यांत लेक्चर देणाऱ्या अध्यापकांच्या नावांमागे डॉक्टर किंवा मिस्टर लावण्यात येते. सामान्यपणे आपण असे गृहीत धरतो की, डॉक्टर म्हणजे पीएच०डी०ची पदवी असलेला, तर मिस्टर हा पीएच०डी० नसलेला. पण त्या काळी रिपोर्टरमध्ये केंब्रिज सोडून इतर विद्यापीठांतल्या डॉक्टरेट मिळवलेल्यांच्या नावांमागेही 'मिस्टर'च असे! केवळ ऑक्सफर्ड याला अपवाद. काही वर्षांनी हा भेदभाव काढून टाकण्यात आला.

त्याचप्रमाणे पुराण परंपरांचा किती प्रभाव असू शकतो याचे एक बोलके उदाहरण म्हणजे १९४८पर्यंत बायकांना ऑक्स्ब्रिज(= ऑक्स्फर्ड + केंब्रिज)मध्ये डिग्री नसे! सर्व परीक्षा पास झाल्यावरसुद्धा त्यांना अमुक डिग्रीपर्यंतच्या परीक्षा पास झाल्याचा दाखला मिळे, पण डिग्री नाही!

मी ह्या वर्षी ट्रायपॉस पार्ट दोनची परीक्षा देणार होतो, तर पुढच्या वर्षी पार्ट तीनची. ज्या विद्यार्थ्यांना पुढल्या वर्षी पार्ट तीनला तोंड द्यायचे होते त्या अस्मादिकांसाठी खास लेक्चर्स पार्ट तीनला 'प्रस्तावनात्मक' म्हणून आयोजलेली होती. त्यावर परीक्षेची टांगती तलवार नव्हती. त्यांत अंकगणित (थियरी ऑफ नंबर्स) ह्या विषयावर प्राध्यापक डेव्हनपोर्ट यांची लेक्चर्स होती. हे प्रख्यात गणितज्ञ केंब्रिजमध्येच शिकलेले व पुढे लंडन विद्यापीठात प्राध्यापक म्हणून राहिलेले आता 'राऊस बॉल प्रोफेसर' म्हणून स्वगृही परतले होते. त्यांची लेक्चर्स लोकप्रिय होती. पार्ट दोनमधली 'इलास्टिसिटी ॲण्ड ग्रॅव्हिटेशन'वर डॉक्टर लॅपवुड यांची लेक्चर्स मला आवडली. शिस्तबद्ध तरी मनोरंजक अशी त्यांची शैली होती. त्यांचेच अनुकरण करत मी प्रत्येक लेक्चर-कोर्सच्या शिस्तबद्ध नोट्स काढायला सुरुवात केली. पुष्कळदा लेक्चरर 'अमुक अमुक भाग तुम्हीच पडताळून पाहा' असे विद्यार्थ्यांना आवाहन करून पुढे जाई. हे भाग पुरे करून पाहणे हेदेखील माझ्या नोट्सचे विषय राहिले.

केंब्रिजमध्ये त्या वेळी वीसच्या आसपास मुलांची कॉलेजे तर केवळ तीनच मुलींची कॉलेजे (गर्टन, न्यूनहम व न्यू हॉल) होती. मुलांच्यात एक सामान्य प्रवाद होता की, केंब्रिज विद्यापीठात शिकणाऱ्या मुली डोक्याने हुशार असतील, पण स्त्री म्हणून फारशा आकर्षक नसतात! ह्या मुद्द्यावर पुष्कळांनी विनोद केले होते, त्यांतला एक असा होता : एक भूगोल-प्राध्यापक केंब्रिजमध्ये वर्गात लेक्चर देताना एका विशिष्ट बेटाबद्दल माहिती देत होते. ''ह्या बेटाची एक खासियत अशी की इथं दर दहा पुरुषांमागे सातच स्त्रिया आहेत... स्त्रियांची इतकी कमतरता पाहून आपण असं विधान करू शकतो की, केंब्रिजच्या विद्यार्थिनींनासुद्धा इथं नवरे सहज मिळू शकतील!'' मुले प्राध्यापकमहाशयांच्या विधानावर हसली, पण मुलींना ते उपमर्दकारक वाटले व त्या 'वॉक-आउट'द्वारे निषेध नोंदवण्यासाठी क्लासमधून बाहेर जाऊ लागल्या, तेव्हा ते प्राध्यापक मागून ओरडले, ''अहो, इतकी घाई कशाला? त्या बेटाकडे जाणारी बोट निघायला अजून बरेच दिवस आहेत!''

मी केंब्रिजला येण्यापूर्वीच तेथील प्रख्यात 'डिबेटिंग सोसायटी' केंब्रिज यूनियनची ख्याती ऐकली होती. एका सर्वसामान्य इंग्लिश क्लबच्या धर्तीवर ऑक्स्फर्ड आणि केंब्रिज यूनियनची रचना झाली होती; पण त्यांचे वैशिष्ट्य प्रस्थापित झाले होते तेथील वादविवाद-सभांमुळे. ब्रिटनचे नाणवलेले वक्ते–त्यांत देशातले पंतप्रधान, पार्लमेंट-सदस्य आदींचा समावेश होतो–ह्या दोन यूनियनमध्ये शिकून तयार झाले. ह्या वादविवाद-सभांत श्रोता म्हणून प्रवेश मिळावा म्हणून मी यूनियनचा आजीव सभासद झालो. ह्या सभांशिवाय तिथे माफक दरात खानपान-सेवा, आणि इतर क्लबच्या सुविधा उपलब्ध होत्या, त्यांचेही आकर्षण होतेच.

यूनियन डिबेटची प्रथा पुष्कळ जुनी असून ती परंपरा टिकवलेली आहे. वक्ते डिनर ड्रेस(टेलकोट व पांढरा बो टाय)मध्ये बोलत. विवादासाठी विषय ठरवून दिलेला असे. त्याच्या बाजूने तीन व विरोधात तीन असे सहा वक्ते असत. कमीत कमी दोन तरी निमंत्रित प्रख्यात व्यक्ती असत. जर वक्ता बोलत असताना श्रोत्याला त्याला थांबवून काहीतरी विधान करायचे असेल तर त्याने बसल्या ठिकाणी उभे राहायचे. असा एखादा श्रोता उभा दिसल्यास वक्ता बोलायचा थांबतो आणि अध्यक्षाने परवानगी दिल्यावर श्रोता आपला मुद्दा मांडतो आणि मग बसतो. वक्ता त्याची दखल घेऊन पुढे भाषण चालू ठेवतो. ब्रिटिश पार्लमेंटचा शिष्टाचार पाळून सर्व काही संयम ठेवून चालते. मला वाटते, आपल्या आमदार-खासदारांना शिष्टसंमत कार्यपद्धती कशी कार्यान्वित होते ते पाहायला अशा डिबेट्सना प्रेक्षक म्हणून पाठवावे!

डिबेटमधली भाषणे उरकल्यावर मतदान होते तेही पार्लमेंट-पद्धतीने. श्रोत्यांना बाहेर जायला दोन दारे असतात–विधानाचे समर्थक 'हो'(Ayes)वाल्या दारातून तर विरोधक 'नाही' (Noes)वाल्यातून. दोन्ही दारांबाहेर 'टेलर' मंडळी (म्हणजे मोजणारी!) बाहेर पडणाऱ्यांची संख्या मोजतात. त्यानंतर विधान संमत झाले का पडले याची आकडेवारीसह घोषणा होते. दर वर्षाच्या आरंभी डिबेट केले जाणारे विधानही ठरलेले आहे : ''ह्या सभागृहाचा राणीसाहेबांच्या शासनावर बिलकूल विश्वास नाही.'' ह्या अविश्वास-प्रस्तावाचे विरोधक म्हणून पंतप्रधानसुद्धा काही वेळा वक्ते म्हणून येऊन गेले आहेत.

ऑक्स्फर्ड केंब्रिज यूनियनच्या डिबेटकडे राष्ट्रीय पत्रकारांचे तसेच समाजधुरीणांचे, राजकारण्यांचे, शासनकर्त्यांचे लक्ष असते. माझ्या दुसऱ्या वर्षीच्या सुरुवातीला वरील मुद्द्यावरील डिबेटसाठी शासनातर्फे एड्वर्ड हीथ (हे त्या वेळी शासनाचे चीफ व्हिप होते व नंतर १९७० साली पंतप्रधान झाले.), तर विधानाच्या समर्थनासाठी विरोधी मजूर पक्षाचे एम० पी० डग्लस हाउटन होते. विधानाच्या बाजूने ४५०तर विरोधात १७६ मते पडली. मला ह्या गोष्टीचे महत्त्व वाटले की, वक्ते उत्तम तयारी करून आले होतेच, पण काही श्रोतेही त्यांना टोकायला लेखी पुरावे घेऊन हजर होते! त्या दिवशी जे विद्यार्थी डिबेटमध्ये बोलले ते पुढे राजकारणात चमकले. पण कौतुक ह्याचे वाटते (व तेव्हाही वाटले) की, सरकारविरुद्ध सडेतोडपणे मत व्यक्त करायला नागरिकच काय, विद्यार्थीदेखील चाचरत नाहीत. आपण जरी ब्रिटिशांकडून डेमॉक्रसीची दीक्षा घेतली तरी ती आपल्या रक्तात भिनायला अजून काही दशके जावी लागतील!



मी केंब्रिजला गेल्यावर काही महिन्यांतच मोरूमामा सरकारी शिष्यवृत्तीवर मॉस्को विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी गेले. त्या वेळी ते बनारस विद्यापीठात अध्यापक असून बीजगणित हा त्यांचा आवडीचा विषय होता. त्यांना मॉस्कोमध्ये नाणवलेले बीजगणितज्ञ प्रा० कुरोश यांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. त्या वर्षीच्या बॅचमध्ये बनारसचे आणखी एक अध्यापक होते–रसायनशास्त्री शुक्ला. परदेशात अनोळखी जागा, अनोळखी भाषा, अतिशय तीव्र थंडी ह्या अवघड परिस्थितीत ह्या दोघांची परस्परांना चांगली सोबत लाभली.

मी शाळेत असल्यापासून माझे माझ्या मामांशी–मोरूमामांशी–सूत जमले होते. त्यांच्या आव्हानात्मक प्रश्नांनी कळत-नकळत माझ्यात आव्हानांना तोंड द्यायची प्रवृत्ती जोपासली गेली होती, जिचा मला आता

ट्रायपॉसची आव्हाने सोडवण्यात फायदा होत होता. गणिताव्यतिरिक्त मोरूमामांना स्थानीय राजकारणात विलक्षण रस होता. जेव्हा महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळ चालू होती तेव्हा तिचे पडसाद आमच्या बनारसच्या घरी मोरूमामांच्या परखड वाणीतून उमटायचे. त्या वेळी त्यांचे नेहरू, गोविंदवल्लभ पंत आदी संयुक्त महाराष्ट्रविरोधी नेत्यांवरचे प्रांजल ताशेरे ऐकून माझ्या आईला–ताईला भीती वाटायची की, हे माझ्या वडिलांच्या–तात्यासाहेबांच्या कानावर पडले तर? कारण तात्यासाहेबांची सहानुभूती ज़री संयुक्त महाराष्ट्र चळवळीला होती, तरी त्या विषयावर बोलताना केलेला भाषेचा अतिरेक त्यांना मान्य नव्हता.

आता मॉस्कोला गेल्यावर मोरूमामांनी तेथील दडपशाहीबद्दल तीव्र शब्दांत टीका असलेली पत्रे मला व ताईला पाठवायचा सपाटा लावला. अर्थात मला पाठवलेल्या पत्रांतील टीका ताईला पाठवलेल्या पत्रांपेक्षा पुष्कळ कडक असायची. पण ताईला आलेली पत्रे वाचून तात्यासाहेबांना बरीच काळजी वाटू लागली. रशियातून बाहेर जाणारी पत्रे सेन्सर होत असली तर ती मराठीत असूनही तेथील राजवटीविरोधी असल्याने, मोरूमामांची देशातून उचलबांगडी तर होणार नाही, याची त्यांना चिंता होती. अर्थात मला आलेली पत्रे पाहून तर त्यांची चिंता अजूनच वाढली असती!

त्या पत्रांतून असे स्पष्ट होई की, गणितासारख्या कठीण क्षेत्रात रशियाने उत्तम प्रगती केली असली तरी तेथील सामान्य जनजीवन जीवनोपयोगी गोष्टींच्या टंचाईमुळे आणि तक्रार करण्यावर दडपशाहीची बंदी असल्याने फार जिकिरीचे होते. मोरूमामांनी कळवलेला एक चुटका रशियन सेन्सरशिपला न जुमानता माझ्यापर्यंत पोचलेला असा होता :

एक रशियन नागरिक सर्व प्रकारच्या टंचायांना तोंड देता देता वैतागून गेला. कुठल्याही जीवनावश्यक वस्तूसाठी लांब क्यूमध्ये उभे राहावे लागे. ब्रेडसाठी क्यू, दुधासाठी वेगळा क्यू, साखरेसाठी आणखी एक क्यू...आणि ह्यातच सर्व वेळ आणि शक्ती खर्च होई. अखेर त्याने महत्त्वाचा निर्णय घेतला : ह्या सर्व राज्य-दुर्व्यवस्थेसाठी जबाबदार मालेनकोव्हचा खून करायचा. सुदैवाने त्याच्याकडे रिव्हॉल्वर होते. ते काडतुसांनी भरून तो मालेनकोव्हच्या निवासस्थानाकडे निघाला. घर जवळ आले तसे त्याला दिसले, अनेक लोक क्यू करून उभे आहेत. त्याने क्यूमधल्या शेवटच्या माणसाला विचारले, ''हा क्यू कशासाठी?'' त्याने हळू बोलायचा इशारा करत म्हटले, ''मालेनकोव्हला मारण्यासाठी!''

मी मोरूमामांना केंब्रिजला येऊन जायला आमंत्रित केले. ही गणिताची नगरी त्यांना खचितच आवडली असती. पण त्यांनी तसा बेत केला नाही. ते म्हणाले की ''इथली दुरवस्था अनुभवल्यावर एका समृद्ध जागी येऊन मला फार जाणवेल की, मॉस्कोतलं वातावरण किती फ्रस्ट्रेटिंग आहे. म्हणून मी सुट्टीकरतादेखील केंब्रिजला येऊ इच्छित नाही!''

मोरूमामा येऊ शकले नाहीत, पण दुसरी एक पाहुणे-दंपती आल्याने मजा आला! आदल्या सप्टेंबरमध्ये प्रिन्सेस स्ट्रीटवर अचानक भेटलेले पु० ल० देशपांडे आणि सुनीताबाई त्या वेळी बोलणे झाले होते त्याप्रमाणे २५-२६ ऑक्टोबर रोजी केंब्रिजला आले. आतापर्यंत केंब्रिज पाहायला आलेल्यांना, त्यांना उपलब्ध असलेल्या वेळेत काय काय दाखवावे याचे कसब कुमार चित्रेला आणि मला साध्य झाले होते. तेव्हा पु० ल० आणि सुनीताबाईंना कुठे कुठे फिरवून आणावे हे ठरवायला आम्हांला वेळ लागला नाही.

प्रत्यक्षात हा पाहुण्यांना केंब्रिज दाखवण्यात वेळ कसा गेला ते कळले नाही. गमतीदार आठवणी आणि कोट्यांनी पु० लं०नी आमची पुष्कळ करमणूक केली, तर मधून मधून सुनीताबाईंची तिखट फोडणी मिळाल्यामुळे त्या आख्यायिका अधिक रुचकर लागत. विद्यापीठातल्या ग्रंथालयात भारतीय ग्रंथांचा विभाग पाहायला त्यांना विशेष रुची होती. त्यांना आर्ट्स थियेटरमध्ये 'द एंटरटेनर' हे नाटक दाखवले. केंब्रिज गावाच्या केंद्रस्थानी हे उत्तम नाट्यगृह (आणि तिथून जवळच आर्ट्स सिनेमागृह) निर्माण करण्यात प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ लॉर्ड केन्सचा सिंहाचा वाटा होता.

पु०लं०ना, सुनीताबाईंना युनिव्हर्सिटीतली धार्मिक प्रार्थनासभा कशी असते ते पाहायचे होते म्हणून आम्ही सर्व ग्रेट सेंट मेरीच्या चर्चमध्ये सकाळच्या सर्व्हिसला जाऊन आलो. त्या दिवशीच्या धर्माख्यानाचा विषय होता : दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेद आणि त्या पार्श्वभूमीवर जगातील वांशिक भेदभाव. दुपारी सेंट पीटर्स टेरेसमधील कुमारच्या खोलीत चहाचा बेत झाला. त्यानंतर गाडी पकडायला अवकाश होता म्हणून उपलब्ध असलेल्या वेळेत पु० लं०नी 'बटाट्याच्या चाळी'तल्या शेवटच्या प्रकरणाचे (चाळीबद्दलचे चिंतन) वाचन केले–ही आम्हां दोघांना एक मेजवानी होती. सव्वापाचच्या लंडन ट्रेनवर त्यांना निरोप देऊन आम्ही परतलो तेव्हा एक प्रकारे दिवाळी-दसऱ्याच्या आनंद आपण लुटला असे वाटले!

पुढे पु०लं०चे *अपूर्वाई* वाचायला मिळाले. त्यात त्यांनी त्यांच्या ब्रिटनच्या यात्रेचे गमतीदार वर्णन केले आहे व त्यातून त्यांच्या निरीक्षणक्षमतेचा प्रत्यय येतो. खुद्द केंब्रिजमध्ये वर्षभर राहून आम्ही दुर्लक्षिलेल्या गोष्टी त्यांच्या बारीक नजरेने टिपून लेखणीकडे पाठवल्या! आमची फक्त एका बाबतीत निराशा झाली–अख्ख्या केंब्रिज-वर्णनात आमचा नामोल्लेखही नव्हता!

केंब्रिजच्या प्रत्येक कॉलेजचा एक ख्रिस्ती धर्मगुरू (चॅपलेन) असतो. फिट्झविलियमचा चॅपलेन पीटर श्नायडर ही एक अवलिया व्यक्ती होती. पहिल्या वर्षी सर्व नवे विद्यार्थी चॅपलेनला भेटतात तसा मीही पीटर श्नायडरला भेटलो होतो; पण मी ख्रिस्ती नसल्याने त्याच्याशी आपला फारसा संबंध येणार नाही असा मी अंदाज बांधला होता. तरी त्याने ''मला पहिल्या नावानं, 'पीटर' असं संबोधन कर'' असे मला पहिल्याच भेटीत सांगितले.

आम्हां दोघांचा फिट्झविलियममध्येच एक जपानी दोस्त होता, त्याचे नाव कझेतोषी हसेगावा. त्याला त्याचे मित्र 'कझिन' असे संबोधत. त्याचे वडील जपानमध्ये टी० व्ही० सेंट्सची निर्मिती करत असून त्यांचे कुटुंब लक्षाधीशाचे होते असे म्हणायला हरकत नाही. स्वत: कझिनकडे एक मोटारगाडी होती–हिंदी सिनेमांत दिसते तशी टप उघडून बाजूला काढण्याची सोय असलेली. त्या काळात, त्याच्याकडे असलेला जपानी कॅमेरा १५० पाउंड किंमतीचा असून त्याच्या मते जगातला दुसऱ्या क्रमांकाचा होता. पण समृद्धीने अलंकृत असला तरी कझिन मनमिळाऊ आणि प्रेमळ होता.

एकदा कझिनने मला आणि पीटरला गाठले. शिवाय आणखी दोन विद्यार्थी बरोबर घेऊन त्याने आपली गाडी रपेट करायला काढली. हवा उत्तम असल्याने केंब्रिजबाहेर कुठे जाता येईल, हा प्रश्न त्याने विचारला. ''आपण हेमिंगफर्ड ग्रेला जाऊ'' असे पीटर म्हणाला. त्याची सूचना उत्तम होती व आम्ही उघड्या मोटारीतून फिरण्याचा आनंद लुटत हेमिंगफर्ड ग्रेला आलो. ते एक सुंदर टुमदार घरांचे खेडे होते. तिथे थोडे फिरून व चहापानाचा आस्वाद घेऊन आम्ही परतलो.

पीटर व कझिनबरोबर अशा तऱ्हेच्या काही सहलींच्या रम्य आठवणी आहेत. एकदा केंब्रिजच्या जपान सोसायटीतर्फे आयोजित साकी पार्टीसाठी तो मला घेऊन गेला होता. तिथे स्त्याकी हा खाद्यपदार्थ मला आवडला. पीटरची बायको त्याच्या 'विरुद्ध' स्वभावाची, पण आतिथ्यशील होती. पीटर जोरात बडबड करणारा, तर जीन कमी व कोमल सुरात बोलणारी. दुसऱ्या वर्षीचे ख्रिसमस-लंच त्यांच्याकडे झाले आणि तेव्हा कझिनलाही बोलावले होते. गरम रोस्ट टर्की व ख्रिसमस पुडिंगचे दणदणीत जेवण झाल्यावर पीटरने टी० व्ही० लावला. दरवर्षीप्रमाणे ह्या दिवशी जेवणे संपण्याच्या सुमारास राणी एलिझाबेथ राष्ट्राला उद्देशून शुभसंदेशपर बोलली. संदेश झाल्यावर पीटर म्हणाला, ''चला, थोडं फिरून येऊ.'' इतके खाणे झाल्यावर थोडे चालल्यामुळे सुस्ती कमी होईल म्हणून आम्ही उठलो. पण हे 'थोडे' फिरणे म्हणजे पाचसहा मैलांची रपेट होती! आधी ट्रंपिंग्टन, मग तिथून ग्रँट्चेस्टर, मग नदीजवळच्या फूटपाथवरून केंब्रिजकडे. हवा कोरडी व मधूनमधून सूर्यदर्शन असल्याने ही पदयात्रा छान वाटली. दुपारचे जेवण पचते न पचते तोवर पीटर म्हणाला, ''चला, आता सपर घ्यायला माझ्या घरी!''

पीटरशी माझा मैत्रीपूर्ण संबंध वाढत गेला. पुढे घडणाऱ्या एका दुर्घटनेमुळे तर मला त्याची पुष्कळ मदत होणार होती!

मला असेच आदरातिथ्य वेळोवेळी मिळत गेले मिसेस फ्रिच ह्या वृद्ध महिलेकडे. मी पहिल्यांदा त्यांच्याकडे जेवायला गेलो ते एका आफ्रिकन सहविद्यार्थ्याबरोबर. त्यांचे यजमान हयात नव्हते, पण पूर्वी केंब्रिज विद्यापीठात बॉटनीचे प्राध्यापक होते. केंब्रिजमधले प्रख्यात अणुशास्त्रज्ञ प्राध्यापक फ्रिच यांचे ते चुलत भाऊ होते. मिसेस फ्रिचना विविध देशांतल्या विद्यार्थ्यांना भेटायला आवडायचे आणि त्यांना त्या चहाला किंवा भोजनाला बोलावत. त्या यूरोपियन पाककलेत सुग्रण असल्याने त्यांच्याकडे जेवणाचे आकर्षक पदार्थ असत.

ख्रिसमसच्या दिवशी पीटर श्नायडरच्या घरच्या मेजवानीचे वर्णन आधीच आले आहे. त्यापूर्वी ख्रिसमस टी-पार्टी टाटा लिमिटेडमध्ये गेल्या वर्षीप्रमाणेच झाली. यंदा मला तिथे सर फ्रेडरिक जेम्स आणि श्री० सकलतवाला हे तेथील उच्चाधिकारी भेटले. माझ्या केंब्रिजच्या पहिल्या वर्षाअखेरच्या यशामुळे टाटातले सर्व लोक माझ्यावर खूष होते. आणि 'काटकसर करून अभ्यासात मोठे यश कमावणारा' अशी माझी भलावण ते इतर टाटा स्कॉलर्सपुढे करत होते.

चहानंतर मी पिकॅडली सर्कस, ऑक्स्फर्ड स्ट्रीट आणि रीजंट स्ट्रीट इथे चक्कर मारून ख्रिसमसची रोषणाई पाहिली. ट्रफालगार स्क्वेअरमध्ये नॉर्वेच्या सरकारने पाठवलेला पाचसहा मजली प्रचंड ख्रिसमस-ट्री रोषणाई आणि भेटवस्तूंनी लादलेला दिसत होता. कमालीची थंडी असूनही रोषणाई पाहायला बघ्यांच्या झुंबडी दिसत होत्या. काही ठिकाणी कोळशावर भाजलेले चेस्टनट विकायला ठेवले होते. डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात हिमपात होऊन गेला होता व त्यामुळे लोक यंदा व्हाइट ख्रिसमसची आशा बाळगून होते. पण तसे घडले नाही!

ख्रिसमसची सुट्टी संपत आली तशी माझी दृष्टी आता जूनमधील परीक्षांवर केंद्रित झाली. आता भटकणे बंद आणि अभ्यासावर जोर! दुसऱ्या वर्षात मला आता केंब्रिजमध्ये राहणे, खाणे, अभ्यासणे, फिरणे आदींचे जीवनचक्र जमत चालले होते. आता दैनंदिन जीवनातील लहानसहान अडीअडचणींना तोंड देऊन आपण पुढे जाऊ शकतो, असा एक प्रकारचा आत्मविश्वास मनात निर्माण झाला होता.

पण ह्या संथ वाटचालीत भविष्याच्या कोपऱ्यात एक धक्कादायक अनुभव दबा धरून बसलाय ह्याची मला कल्पना नव्हती!

माझ्या ८ फेब्रुवारीच्या घरी आईवडिलांना लिहिलेल्या पत्रात दैनंदिन जीवनातील सामान्य घटनांचे उल्लेख आहेत : मी टी०व्ही०वर लहानपणी वाचलेल्या डब्ल्यू० डब्ल्यू० जेकबस्च्या खलाश्यांच्या जीवनावर आधारलेल्या गोष्टींवर 'द नाइटवॉचमन्स स्टोरीज' ही नवी मालिका सुरू झाल्याचे लिहिले आहे. यातील काही गोष्टी मी ताईच्या कथावाचनातून ऐकल्या होत्या, तेव्हा तिलाही ह्या टेलिविजन कार्यक्रमात रस वाटला असता. मी ब्रिटिश काउन्सिलद्वारा आयोजित ईस्टरच्या सुट्टीत उत्तर वेल्सच्या दौऱ्यात सामील व्हायच्या निर्णयाचा उल्लेख केला आहे. तसेच माझ्या एका फिट्झबिली मित्राने (टेरी मॅक्रे हे त्याचे नाव) आवर्जून बोलावल्यामुळे तो खेळत असलेली कॉलेजची रग्बी मॅच पाहिल्याचे लिहिले आहे. डायनॅमिक्स आणि कॉम्प्लेक्स व्हेरियेबल हे विषय शिकवणाऱ्या प्रा० पार्स यांनी मला त्याच आठवड्यात विचारल्याचा उल्लेख आहे : ''तीस वर्षांपूर्वी तुझ्याच आडनावाचा एक भारतीय विद्यार्थी माझ्या लेक्चर्सना येई; त्याचा तू कोणी नातलग आहेस का?'' ''ते माझे वडील,'' मी उत्तरलो होतो. आणि पत्राअखेर हे पण नमूद केले होते : 'परवा मी वार्षिक वैद्यकीय तपासणीसाठी फेनर्स येथील विद्यापीठाच्या वैद्यकीय विभागाकडे जाणार आहे.'

पण ९ फेब्रुवारीला वेगळेच घडायचे होते!

जेव्हा मी कॉलेजकडून घरी जात असे तेव्हा शॉर्टकट म्हणून डाउनिंग कॉलेजच्या मागच्या गेटमधून आत शिरून, पुढच्या गेटमधून रीजंट स्ट्रीटवर बाहेर पडत असे. अर्थात् ही शॉर्टकट मी सायकलवरून न जाता चालत जाताना वापरत असे. रीजंट स्ट्रीटवरील १०२ नंबरची बस मिल रोडवरून जाई आणि डाउनिंग कॉलेज-जवळच्या बसस्टॉपपर्यंत चालत गेल्यास तिकिटात सहा पेन्स वाचत म्हणून मी हा मार्ग निवडला होता. ९ फेब्रुवारीला सायंकाळी मी ह्या मार्गाने जात होतो आणि डाउनिंगच्या मागच्या गेटशेजारून जाणारा टेनिस-कोर्ट रोड ओलांडत होतो. इतक्यात कोपऱ्यावरून एक स्कूटर वेगाने आली आणि तिने मला धडक मारली. मी रस्ता क्रॉस करत असताना कुठल्यातरी विचारात मग्न होतो म्हणून रस्ता पाहून पुढचे पाऊल टाकले नसावे. स्कूटरस्वारही वेगाने येत असल्याने बचावाची क्रिया नीट करू शकला नाही.

मला आजही अंधूकसे आठवते की, धक्क्याने मी काही अंतर फेकला गेलो आणि रस्त्याशेजारच्या फूटपाथजवळ पडलो.



उजवीकडून डॉ० नारळीकर, त्यांचे बंधू, आई आणि वडील
(पदवी मिळाली तेव्हा)

स्कूटरस्वार मी कुठल्या स्थितीत आहे ते पाहायला थांबला. त्यानेच (किंवा रस्त्यावर एकदोनच लोक होते त्यांपैकी कुणीतरी) ॲम्ब्युलन्स बोलावली. सुदैवाने ॲक्सिडेंट झाला ती जागा ॲडनब्रुक्स हॉस्पिटलच्या मागेच होती. ॲम्ब्युलन्स लवकरच आली आणि त्यातील परिचारकाने स्ट्रेचरवर मला घालून ड्रायव्हरच्या मदतीने आत चढवले. ''काळजी करू नकोस...तू एकंदरीत बरा आहेस. काही ठिकाणी खरचटलंय...पण डाव्या पायाचं हाड बहुतेक मोडलं आहे.'' तो मृदू आवाजात म्हणाला. त्याने माझा पाय काळजीपूर्वक धरून हलवला. तो गुढघ्यापासून सहा-आठ इंचांवर मोडलेला जाणवला. ''दुखतं आहे का?'' त्याने विचारले. मला पायाचे हाड मध्येच मोडलेले दिसत होते, पण मी शॉकमध्ये असल्यामुळे वेदना जाणवत नव्हती. मी नकारार्थी मान हलवली आणि मनाशीच म्हटले : आता ह्या मोडक्या पायाचा खालचा भाग मला गमवावा लागणार काय?

तोपर्यंत ॲम्ब्युलन्स हॉस्पिटलच्या एमर्जन्सी वॉर्डजवळ आली. मला एका ट्रॉलीवर ठेवण्यात आले. माझ्या गळ्याभोवती कॉलेजचा स्कार्फ पाहून मी फिट्झविलियमचा विद्यार्थी आहे हे ओळखून तिथल्या स्टाफने मि० वॉल्टर्सशी संपर्क साधला. आणि थोड्या वेळात ते स्वत: आणि रेव्हरंड पीटर श्नायडर दोघे तिथे आले. हे सर्व इतक्या झटपट झाले की, त्या अवस्थेतही मला हॉस्पिटल-कॉलेज-यंत्रणेचे कौतुक वाटले. दरम्यान एका डॉक्टरने माझी प्राथमिक तपासणी केली होती. त्याच्या रिपोर्टवरून वॉल्टर्स-श्नायडर-द्वयीने मला आश्वस्त केले : ''तू काळजी करू नकोस...इथले तज्ज्ञ तुझी योग्य ती काळजी घेतील... आम्ही तुझ्या आई-वडिलांना कळवतो.'' इत्यादी, इत्यादी. मला वाटते की, अशा आश्वासनांमुळे असेल किंवा मूळच्या स्थितप्रज्ञवृत्तीमुळे असेल, मी त्या वेळी फार चिंतित असल्याचे आठवत नाही.

मोडलेल्या हाडाच्या जुळणीसाठी आधी त्यावर प्लास्टर चढवण्यात आले. पण ही प्राथमिक उपचारक्रिया पुरेशी होणार नाही असे तज्ज्ञांचे मत पडले. दोन हाडांच्या भागांना जोडणारी एक स्टेनलेस स्टीलची पट्टी हाडाजवळ लावून मग प्लास्टर चढवावे, असा निर्णय प्रख्यात ऑर्थोपीडिक सर्जन मिस्टर बटलर यांनी घेतला. 'मिस्टर'–'डॉक्टर' नव्हे, कारण रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्सचे फेलो नावामागे 'डॉक्टर'ऐवजी 'मिस्टर' लावणे पसंत करतात. प्रख्यात हुजूरपक्षीय नेते आणि गृहमंत्री आर० ए० बटलर यांचे मिस्टर बटलर हे बंधू होत. ते नुकतेच सौदी राजघराण्यातील एका अतिमहत्त्वाच्या व्यक्तीवर शस्त्रक्रिया करून आले होते. माझ्यावरील शस्त्रक्रिया तेच करणार होते.

ही शस्त्रक्रिया त्याच रात्री करण्यात आली. मला जनरल अनेस्थेटिक देण्यापूर्वी आश्वासन देण्यात आले : ''एका आठवड्यात तू चालू शकशील.''

दुसऱ्या दिवशी सकाळी मी जागा झालो तेव्हा माझा डावा पाय संपूर्ण प्लास्टरमध्ये होता–कमरेपासून पावलापर्यंत. फक्त हवा यावी-जावी म्हणून पायाची बोटे उघडी होती.

मिसेस 'एफ'ला–माझी निवासाची सोय करणारी मिसेस फोर्डहमला–अर्थातच त्याच रात्री कळवण्यात आले, नाहीतर मी रात्री दहापर्यंत न आल्यावर फोर्डहम कुटुंबीयांनी काळजी करायला सुरुवात केली असती. मिसेस 'एफ' मला भेटायला सकाळी आली तेव्हा मला घरून आलेले एक पत्र घेऊन आली. अर्थात हे पत्र माझ्या ॲक्सिडेंटची वार्ता तिथे पोचण्यापूर्वी लिहिलेले होते. मला भेटायला येणाऱ्यांत विलियम्स, वॉल्टर्स आणि श्नायडर हे फिट्झविलियममधले त्रिकूट, डॉक्टर लॅपवुड, मिस्टर थॅचर आदी होते. त्या तीनचार दिवसांत कुमार चित्रे आणि माझे एकंदर मित्रमंडळ पुष्कळदा येऊन गेले. फिट्झविलियमचे सेन्सर म्हणून नुकतीच नेमणूक झालेले डॉक्टर ग्रेव्ह हे पण भेटून गेले. मला भेटून जाणाऱ्यांचा ओघ पाहून नर्सेस म्हणाल्या, की मी बराच लोकप्रिय असलो पाहिजे!

पीटर श्नायडरने मला एक चेस आणि ड्राफ्ट्सचा सेट आणून दिला. मला बुद्धिबळाचे नियम माहीत होते, पण ड्राफ्ट्सची दीक्षा पीटरकडून मिळाली. पीटरने माझे पुष्कळ लाड केले. एकदा एका भारतीय रेस्ट्रॉंमधून 'करी-राइस' घेऊन आला. वाचायला पुस्तके आणली. सी० पी० स्नो याने लिहिलेली कादंबरी *द मास्टर्स* मी हॉस्पिटलमध्येच वाचली. ही मला वॉल्टर्सनी आणून दिली होती. एका कॉलेजच्या मुख्याची निवडणूक होताना काय काय राजकारण घडले या सत्यघटनेवर ही कादंबरी आधारलेली आहे. त्यांत वॉल्टर्सनी पेन्सिलीत काल्पनिक पात्रांच्या मागे खऱ्या व्यक्तींची नावे लिहिली होती. आणखी एका कादंबरीने माझी करमणूक केली, ती म्हणजे फ्रेड हॉएलची *द ब्लॅक क्लाउड*. हॉएल यांचा लेक्चर कोर्स मला आवडला होता. आता विज्ञानकादंबरीद्वारे त्यांच्या बहुरंगी प्रतिभेचा आणखी एक पैलू मला पाहायला मिळाला. ह्या असामान्य व्यक्तिमत्त्वाबरोबर शोधकार्य करायला मिळेल असे मला त्या वेळी वाटले नव्हते!

अर्थात ही घटना लेंट सत्रात घडली त्यामुळे माझी त्या सत्रातली लेक्चर्स ह्यापुढे बुडाली. पण कुमार चित्रेकडून नोट्स मिळाल्याने मी हॉस्पिटलमध्ये माझा अभ्यास चालू ठेवू शकलो. शिवाय गरज पडली तर मला स्पेशल सुपरव्हिजन द्यायची तयारी माझे गतवर्षीचे सुपरव्हायजर डॉ० लिटिल्टन यांनी दर्शवली.

ऑपरेशननंतर दहा दिवस मी हॉस्पिटलमध्ये होतो. पण हॉस्पिटलमध्ये जागेची टंचाई असल्याने ज्या रोग्यांना अजून घरी पाठवता येत नाही, पण ज्यांच्यासाठी फार मोठ्या वैद्यकीय यंत्रणेची गरज नाही

अशांची व्यवस्था डग्लस हाउस नावाच्या एका नर्सिंगहोममध्ये केली जात असे. तेव्हा एक दिवशी सकाळी मला ॲम्ब्युलन्समधून डग्लस हाउसकडे नेण्यात आले. हॉस्पिटलमधून बाहेर पडण्यात एक विशेष आनंद वाटला–पण अजून घरी रवानगी होत नाही म्हणून मी थोडा खट्टूही होतो. शिवाय संपूर्ण पाय प्लास्टरमध्ये असल्याने, आपण चालणार कसे आणि केव्हा ही चिंता पण अधूनमधून सतावत असे.

''ही घे तुझी आजची फॅन-मेल,'' असे म्हणत डग्लस हाउसमधली सिस्टर मला ब्रेकफास्टच्या वेळी माझी पत्रे आणून देई. मला विविध ठिकाणांहून मित्रांची, नातलगांची पत्रे येत, ज्यांत माझ्या प्रकृतीबद्दल शुभकामना असत. ऑपरेशननंतर टाके काढायचे असत. त्यासाठी प्लास्टर कापून काढले तेव्हा मला एकदम फार हलके वाटले. पण टाके काढून झाल्यावर नव्याने प्लास्टर घातल्याने पुन्हा 'जैसे थे'चीच परिस्थिती होती, त्याने मी थोडासा निराश झालो. माझ्या प्रगतीवर लक्ष ठेवणारे सर्जन, मिस्टर टाउन्सेंड यांनी माझे सांत्वन केले : माझी प्रगती उत्तम होती, मोडलेले हाड जुळत आल्याचे एक्स-रे-चित्रीकरण ग्वाही देत होते. अशीच प्रगती राहिली तर तीनचार आठवड्यांनी केवळ गुडघ्यापर्यंतच प्लास्टर ठेवू, असे त्यांनी आश्वासन दिले.

दरम्यान एक पोलीस पण येऊन भेटून गेला. त्याने अपघाताबद्दल माझी जबानी घेतली. अपघाताची जबाबदारी सर्वस्वी स्कूटर-चालकाची काय असे त्याने विचारले. माझेही रस्ता ओलांडताना ट्रॅफिककडे दुर्लक्ष झाले असे मी प्रांजलपणे सांगितले. तेव्हा 'उभयपक्षी जबाबदारी' अशी नोंद करून ही 'केस' बंद करावी असे त्याचे मत पडले. माझे ट्यूटर मिस्टर वॉल्टर्स यांनी पण तसाच सल्ला दिला. तो स्कूटर-चालक मला हॉस्पिटलमध्ये भेटून गेला होता व त्याने दुर्घटनेबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती. आपल्या हातून हा अपघात घडला म्हणून त्या रात्री आपल्याला झोप आली नाही, हे त्याने आपणहून सांगितले. ह्या सर्व बाजू विचारात घेता ह्या घटनेला न्यायालयापुढे आणण्यात काही हशील नाही असे मी ठरवले.

डग्लस हाउसमध्ये मला एकट्याला संपूर्ण खोली होती. वाचायला पुस्तके होती. चेस/ड्राफ्ट्स खेळायला शेजारच्या खोलीतले एकदोन रुग्ण होते, जे चालत माझ्याकडे येऊ शकत. (मला अद्याप चालायची परवानगी नव्हती.) ॲडनब्रुकपेक्षा डग्लस हाउस (ट्रंपिंग्टन रोडवर) गावापासून जरा लांब होते, तरी मला भेटायला येणाऱ्यांचा ओघ कमी झाला नाही. वीकएण्ड्स व बुधवारी भेटायची वेळ दुपारी २.३० ते ३.३० तर इतर दिवशी सायंकाळी ७.३० ते ८.०० असे.

ऑपरेशनची बातमी कळवणारे माझे पत्र पोचल्यावर घरून आलेले पहिले पत्र माझ्या हाती आले ते दहाबारा दिवसांनी डग्लस हाउसमध्ये. माझ्या आईवडिलांनी पुष्कळ विचार करून लिहिले होते. त्यांना अर्थातच पुष्कळ चिंता वाटत होती, पण मला त्याची झळ लागू नये असे शब्द वापरले होते. माझे स्वत:च्या हाताने लिहिलेले पत्र पाहून त्यांना खास दिलासा वाटला. शिवाय वॉल्टर्स, थॅचर, लॅपवुड आदींची वेगवेगळी पत्रे माझ्या बरे होण्याच्या मार्गावरचे अहवाल त्यांना देत होती.

अखेर सात मार्चला, म्हणजे अपघातानंतर चार आठवडे उलटण्यापूर्वी, मला घरी जायची परवानगी मिळाली. तत्पूर्वी मला कुबड्या घेऊन चालायची दीक्षा देण्यात आली–केवळ खोलीतल्या खोलीत नव्हे तर जिन्यावरून वरखालीसुद्धा. स्वत:चे कपडे स्वत:

कसे घालायचे याचेपण प्रात्यक्षिक माझ्याकडून करवून घेण्यात आले. मला आता कसलीही वेदना जाणवत नव्हती; पण अजून प्लास्टर निघण्याचा मुहूर्त लागत नव्हता. पेशंटला 'पेशंट का असावे लागते ते आता समजले!–' सर्व सुधारणा आस्ते आस्ते होणार होत्या, त्यासाठी धीर धरणे आवश्यक होते.

एक सुंदर संयोग म्हणावा तसे घरून पाठवलेले खाद्यपर्थांचे एक पार्सल मी आलो त्या दिवशीच २०० मिल रोडला येऊन पोचले होते. मिसेस 'एफ'नेही आल्याआल्या माझे लाड केले. तिने खालची सिटिंग रूम माझ्या दिवसाच्या वापरासाठी, अभ्यासासाठी दिली, म्हणजे मला सारखे खाली-वर करायला नको. मला माझ्या वरच्या खोलीतून काही लागले तर ती स्वत: आणून देई.

पीटर श्नायडरला काळजी की मी सदैव घरी एका खोलीत बसू नये. काहीतरी 'पालट' मिळावा म्हणून त्याने फिट्झविलियममधल्या काही कारवाल्या धनिक विद्यार्थ्यांना सांगितले की, त्यांनी मला त्यांच्या गाड्यांतून रपेट करून आणावी. तेव्हा कझिन हासेगावा आणि टेरी मॅक्रे यांनी मला आसपासच्या खेड्यांतून फिरवून आणले. अशा 'ट्रिपां'मध्ये दुपारचा चहा (क्रीम, टोस्ट, सॅण्डविच, केक आदींमुळे साग्रसंगीत) समाविष्ट असायचा.

मी घरी परतल्यावर दोनतीन दिवसांनीच लेंट सत्रातले लेक्चर्स संपणार असल्याने मी चुकलेल्या अभ्यासक्रमाची भरपाई घरबसल्याच करायचा निर्णय घेतला. कुमारच्या नोट्सवरून मी स्वत:च्या बनवल्या आणि काही पूर्वपरीक्षांतले प्रश्न सरावासाठी सोडवायला घेतले.

पण ईस्टरची सुट्टी सुरू झाली तशी वॉल्टर्स आणि श्नायडर द्वयीने माझ्यासाठी एक योजना आखली : डेव्हन काउंटीमध्ये लिंटनजवळ लीअॅबी नावाचे एक मोठे घर होते. तिथे ऑक्स्ब्रज कॉलेजातले धर्मशास्त्रातले (थिऑलजी) विद्यार्थी तीन आठवड्यांच्या अभ्यास-दौऱ्यासाठी जमत. त्यांच्या लेक्चर्सव्यतिरिक्त ते तिथे घरकाम/बागकाम करत व उरलेल्या वेळात आसपासच्या भागात हायकिंग. पीटरने सुचवले की, मी दहा दिवसांसाठी ह्या लोकांबरोबर ली अॅबीत राहावे–तो एक उत्तम विरंगुळा असेल. मला अभ्यास भरून काढायलादेखील हे दिवस उपयोगी पडतील. वॉल्टर्सनी ह्या प्रस्तावाला अनुमोदन दिले व पीटरला सर्व व्यवस्था करायला सांगितले.

केंब्रिजमधल्या मुलांना ली अॅबीकडे न्यायला एक स्पेशल बस १४ मार्चला निघणार होती. हासेगावा आपली मोटार घेऊन आला व त्याने मला सिनेट हाउसपाशी आणून सोडले. बस इथून सुटणार होती. पीटरने मला पुढच्या सीटवर, जिथे सबंध पाय पसरलेला मावेल अशा ठिकाणी बसवले आणि ड्रायव्हर व इतर मुलांना माझी खास काळजी घ्यायची विनंती केली. बस वीसएक मिनिटे उशिरा, ८.१५ऐवजी ८.३५ला सकाळी सुटली. आम्ही हेंडनला सकाळी दहाला पोचून तिथे काही मुले घेतली. त्या काळी मोटरवे, बायपास वगैरे काही नसल्याने बस रेडिंग, मार्लबरा (इथे लंचचा स्टॉप झाला), ब्रिजवॉटर, माइनहेड आदी गावांतून रमतगमत संध्याकाळी साडेसातला ली अॅबीला पोचली. डेव्हनमधले रस्ते वळणाचे, उंच खाली जाणारे, शिवाय अरुंद असल्याने ड्रायव्हरचे बस चालवण्याचे कसब दिसून आले. इतकेच नव्हे, एकंदर शिस्तबद्ध रहदारीमुळे ह्या ४०० किलोमीटर प्रवासात ड्रायव्हरला एकदाच हॉर्न वाजवावा लागला!

'इंग्लिश कंट्री हाउस' ह्या सदरात बसणारे ली अॅबी एका उंच टेकडीवर होते. तिथल्या शंभर लोकांना सामावून घेणाऱ्या खोल्यांपैकी दक्षिण पश्चिमेकडच्या खोल्यांतून समुद्राचे दर्शन होई. घराभोवती २६० एकर जमीन चारी बाजूंना पसरलेली होती. तेव्हा बागकाम करणाऱ्यांना भरपूर मुभा होती! माझी खोली आरामशीर, सेंट्रल हीटिंगद्वारे गरम ठेवलेली, बेड, वॉर्डरोब, वॉशबेसिन, शेल्फ, टेबल, खुर्ची आदी सुविधा असलेली होती. पण मी माझ्या अभ्यासासाठी तेथील प्रशस्त ग्रंथालय पसंत केले. मला माझे अभ्यास-वाचन आदी करायला मोकळीक होती–इतर विद्यार्थ्यांच्या अभ्यासाशी माझा सबंध नव्हता; पण मी त्यांना जेवणाच्या वेळी, ब्रेकफास्ट व चहाच्या वेळी भेटायचो.

ली अॅबीत दोन मांजरे होती. एक नेहमी घरातच फिरायचे किंवा बसून असायचे, तर दुसरे घराबाहेर फिरत असायचे. एरव्ही शांत दिसणारी ही मांजरे क्वचित प्रसंगी जेव्हा परस्परांजवळ येत (हे बहुधा घराच्या सीमेजवळ घडायचे!) तेव्हा गुरगुरून भांडत. आलेले पाहुणे विद्यार्थी गमतीने म्हणत की, अॅबीमधल्या धार्मिक वातावरणाचा इथल्या मांजरांवर काहीच प्रभाव पडलेला दिसत नाही!

वसंत ऋतू असल्याने आणि सूर्यप्रकाश केंब्रिजच्या मानाने मुबलक असल्याने बाहेर फिरायला आराम वाटे. मी मधूनमधून कुबड्यांची मदत घेऊन पाव मैलाची (सुमारे ४०० मीटर) चक्कर मारून येत असे. तिथून काही आकर्षक जागा इतक्या अंतरावर होत्या, जिथून समुद्रदर्शन होई व उंचसखल असा डेव्हनचा किनारा दिसे. पीटरचे आयोजनचातुर्य इथेही अनुभवले. त्याचा एक मित्र जॉन लव्हेल ऑक्स्फर्डहून बायकोमुलांसकट आला होता. त्यांनी आपल्या कारमधून मला आसपास फिरवून आणले व तेथील दर्शनीय ठिकाणे–हंटर्स इन, वुडी बे, शॅलोफर्ड आदी– दाखवली. माझ्या डाव्या पायावर प्लास्टर असल्याने बूट नसे, केवळ मोज्याने उघडी बोटे झाकली जात. ते पाहून जॉन लव्हेलच्या अडीच वर्षांच्या मुलाला एक प्रश्न पडला. तो सारखा विचारत होता : ''दुसरा बूट कुठे गेला?'' अखेर मी त्याचे समाधान केले : ''रिचर्ड, मी माझा दुसरा बूट घरी विसरलो.'' जॉन लव्हेलप्रमाणेच रेव्हरंड टकर हे पण मला वॉटर्समीटला घेऊन गेले, तेव्हा उंच-खाली चढणाऱ्या-उतरणाऱ्या रस्त्यांवरून डेव्हनच्या सौंदर्याचे उत्तम दर्शन घडले.

ह्या सर्व मनोरंजक अनुभवांत आणि ग्रंथालयातील विनाव्यत्यय अभ्यासात दहा दिवस भर्रकन गेले. मी आता परतणार होतो, पण बाकीची मुले अजून दहा दिवस मुक्काम करणार होती. ती सर्व बसने परतणार; पण माझे काय? हा प्रश्न अर्थातच पीटरने सोडवला होता किंवा असे म्हणणे जास्त बरोबर ठरेल की, त्याच्यापुढचा हा प्रश्न अनपेक्षित रीत्या सुटला होता. त्याने ह्याबाबत फिट्झविलियमचे नवे सेन्सर डॉ० ग्रेव्ह यांच्याशी चर्चा केली, तेव्हा ते म्हणाले, ''ती काळजी करू नकोस. मी व माझी पत्नी कारने जाऊन नार्लीकरला परत घेऊन येऊ.'' हा त्यांचा चांगुलपणा मला भारावून टाकणारा होता. एका कॉलेजच्या विद्यार्थ्याला ४०० किलोमीटर अंतर जाऊन घेऊन येण्यासाठी कॉलेजचे प्रमुख आपण होऊन पुढे येतात यावरून मला इंग्लंडसारख्या स्वभावाने 'थंड' समजल्या जाणाऱ्या देशात किती प्रेमळ आणि परोपकारी वृत्ती अनुभवायला मिळाली याची कल्पना येईल!

मला पीटरने कळवले की, २३ मार्चला सकाळी पावणेदहा वाजता ग्रेव्ह पतिपत्नी मला घ्यायला ली अॅबीच्या मुख्य दाराशी येतील.



त्याप्रमाणे मी माझ्या यजमानांचा निरोप घेऊन बॅगेसकट मुख्य दाराशी उभा होतो, अर्थात कुबड्या घेऊन. ग्रेव्ह दंपती बरोबर पावणेदहाला आली. प्रथम त्यांनी मला पुढच्या सीटवर बसवण्याचा प्रयत्न केला, पण ताठ पायासकट मी मावत नव्हतो. मग त्यांनी मला मागल्या सीटवर आडवे बसवले आणि गाडी सुरू केली. पण अर्धा तास ड्राइव्ह केल्यावर त्यांना काहीतरी आठवले आणि त्यांनी गाडी थांबवत विचारले, ''मला आत्ता डोक्यात आलं, नार्लीकर...तुझं सामान नाही का?'' मी चकित होऊन उत्तरलो, ''होतं ना! मी उभा होतो तिथेच शेजारी माझी बॅग होती, सर! आपण ती कारच्या डिकीत टाकली असं मी समजून होतो.'' ''बापरे!'' ते उद्‌गारले. ''तुला बसवण्याच्या गडबडीत मी बॅगेला पूर्ण विसरलो की!'' तेव्हा त्यांची बायको शांतपणे उत्तरली, ''काही बिघडलं नाही...आपण परत जाऊन ती बॅग घेऊ.'' त्यांनी गाडी वळवून पुन्हा ली ॲबीचा रस्ता घेतला. माझ्या मनात धाकधूक होती : तासभर ती बॅग होती तिथेच सुखरूप असेल का? पण होती! लांबून ती दिसत होती. ज्या देशात सार्वजनिक स्तरावर सचोटीची खात्री देता येते तिथे ही अपेक्षा असंभाव्य नव्हती. आमचा पुन्हा सुरू झालेला प्रवास व्यवस्थित पार पडला आणि ग्रेव्ह दंपतीने मला सायंकाळी मिसेस एफच्या सुपूर्द केले.

ईस्टरची सुट्टी संपत आली तशी माझी बुडालेल्या लेक्सर्सची तयारी झाली होती व मी ईस्टर सत्रातली लेक्चर्स प्रत्यक्ष हजेरी लावून ऐकण्याचा निर्धार केला. त्यासाठी कुबड्या घेऊन बसमध्ये चढणे, उतरणे, चालणे, बेंचवर पाय पसरून बसणे आदींना तोंड द्यावे लागले. तरी सत्राच्या सुरुवातीला मी वॉल्टर्सना भेटलो तेव्हा ते म्हणाले, ''तुला हवं असलं तर यंदा ड्रॉप घेऊन पुढल्या वर्षी तू ह्या परीक्षेला बसू शकतोस. तू काय ठरवलं आहेस?'' मी उत्तरलो, ''नाही सर! मी पूर्ण तयारीनिशी यंदाच ही परीक्षा देणार.'' जर त्यांना मराठी कळत असते तर मी म्हटले असते, ''ही परीक्षा द्यायला मी एका पायावर तयार आहे!''

उपयोजित गणितासाठी ईस्टर सत्रात मला डॉ० लिटिल्टन हे सुपरव्हायजर म्हणून लाभले. शुद्ध गणितासाठी डॉ० लॅपवुड यांनी त्यांचे चिनी मित्र डॉक्टर वे यांना नेमले. दोघांचेही मार्गदर्शन उत्तम होते.

अजून पायात पूर्ण लांबीचे प्लास्टर होते. त्याच्यावर बोटांना झाकणारा मोजा चढवावा लागे. सामान्य मोजा दुमडून प्लास्टरच्या टोकावर घालण्याची कसरत मला जमत नव्हती; कारण हात तिथपर्यंत पोचत नसे. घरातून बाहेर पडण्यापूर्वी मिसेस 'एफ' तो चढवून द्यायची. एकदोनदा तो रस्त्यात किंवा बसमध्ये गळून पडला त्या वेळी जवळच्या अनोळखी व्यक्तीने तो परत चढवल्याचे आठवते!

दरम्यान मित्रमंडळी, जेफरीज, लॅपवुड, थॅचर, विलियम्स आदींकडे चहा-किंवा-भोजनास जाणे सुरू केले. डॉक्टर मित्रांपैकी अरुण महाजनी आणि किशोर श्रीखंडे यांच्या भेटीने मजा आला. डॉक्टर श्रीखंडे यांनी नुकताच डबल एफ०आर०सी०एस० मिळवायचा विक्रम केला होता व त्याप्रीत्यर्थ त्यांनी चित्रे, महाजनी व मी–आम्हां तिघांना भारतीय उपहारगृहात मेजवानी दिली. मोठा पराक्रम गाजवूनही त्याबद्दल विनयशील अशा किशोर यांच्या उत्साहपूर्ण व्यक्तिमत्त्वाने मी भारावून गेलो. आजही मधून मधून हा उत्साहाचा झरा भेटतो तेव्हा केंब्रिजच्या गोष्टींची पारायणे होतात. त्या दिवशी किशोरने सांगितले की, मला ५ सप्टेंबर १९५७ रोजी बोटीवर निरोप देऊन माझे आईवडील पुराणिक कुटुंबाकडे गेले होते, तिथे त्यांची आणि किशोरची ओळख झाली होती.

वसंत ऋतूचे ग्रीष्म ऋतूत रूपांतर होताना क्रिकेटचा मोसम सुरू होतो. ह्या वर्षी भारतीय क्रिकेट टीमचा दौरा होता. त्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे ते केंब्रिजला आले व फेनर्स ग्राउंडवर त्यांचा केंब्रिज विद्यापीठाशी मुकाबला झाला. दिवसाचे तीन शिलिंगांचे तिकीट काढून मी एक दिवस मॅच पाहिली. विद्यापीठाची टीम फारशी नाणावलेली नसल्याने भारतीयांनी सहज विजय मिळवला. पण भारतीय गोलंदाजांपैकी तीव्र गतिवाल्यांना घाबरण्याचे कारण नाही, असा बोलबाला वृत्तपत्रांत सुरू झाला होता.

पुढे पायातले प्लास्टर कमी झाल्यावर आणि परीक्षा संपल्यावर मी एक दिवस लंडनचा दौरा करून लॉर्ड्स मैदानावर भारत विरुद्ध इंग्लड टेस्टमॅच पाहिली. ह्याबाबतीत मी नशीबवान ठरलो. तो दिवस कोरडा व सूर्यप्रकाशित होता. मी सेंट जॉन्स वुड ट्यूब स्टेशनवर बाहेर येऊन लॉर्ड्सचा पत्ता काढत अकराच्या सुमाराला ग्राउंडच्या एका दाराशी पोचलो. मॅच साडेअकराला सुरू व्हायची होती. मी तिकिटाची खिडकी शोधायला लागलो आणि समोर एका पोलीसाला त्याबद्दल विचारले. त्याने उलटपक्षी मलाच विचारले, ''तू भारतीय आहेस का?'' मी होकारार्थी उत्तर दिल्यावर त्याचा दुसरा प्रश्न : ''तू विद्यार्थी आहेस का?'' मी याचेही होकारार्थी उत्तर दिल्यावर त्याने खिशातून एक तिकीट काढून मला दिले आणि म्हणाला, ''एका सद्‌गृहस्थांनी हे आजचं तिकीट मला दिलं. त्यांना काही कामामुळे आज मॅच पाहता येत नाही, तेव्हा हे तिकीट एका भारतीय विद्यार्थ्याला भेट म्हणून द्यावं

अशी सूचना करून त्यांनी माझ्याकडे दिलं.'' तो स्मित करत उद्‌गारला, ''एंजॉय द मॅच!'' हे फुकट मिळालेले तिकीट घेऊन मला चांगल्या जागेतून मॅच पाहता आली.

एप्रिलच्या प्रारंभी फुल प्लास्टर काढण्यात आले. त्याऐवजी गुढघ्यापर्यंतचे प्लास्टर बसवण्यात आले आणि त्याला टाचेखाली प्लास्टरचा टेकू दिला, जेणेकरून मी त्याचा बुटासारखा वापर करू शकेन. आता कुबड्यांची गरज राहिली नाही आणि मी त्या आनंदाने हॉस्पिटलला परत केल्या. पूर्ण प्लास्टरचे वजन गेल्याने, तसेच पाय आता गुढघ्याजवळ वाकवता येत असल्याने खूप हलके वाटे–कधीकधी संपूर्ण पायच आपोआप हवेत वर जाऊ पाही! यानंतर दीड महिन्याने बॅण्डेजवजा हलके प्लास्टर घातले, ज्यावर मी मोजा चढवू शके आणि बूटही चढवू शके.

दरम्यान एका पायावर परीक्षा देण्याच्या माझ्या तयारीला साद देऊन पार्ट दोनची परीक्षा उभी ठाकली. आमची पेपर लिहिण्याची जागा गतवर्षीच्या पार्ट एकप्रमाणेच युनिव्हर्सिटी लायब्ररीत होती. गेल्या वर्षी तिथे पेपर लिहून मी यश (पार्ट एकमध्ये पहिला क्रमांक) मिळवले होते म्हणून त्या जागेशी माझ्या सुखी स्मृती जोडलेल्या होत्या. जून १, २, ३ ह्या परीक्षेच्या तारखा आणि रोज दोन पेपर, पार्ट एकप्रमाणे. घरच्या पत्रात रिपोर्ट देताना मी म्हटले आहे की, सहा पेपरांत मी ४+५+५+५+५+६=३० प्रश्न सोडवू शकलो तर सहा प्रश्न अर्धवटच सुटले. प्रत्येक पेपरात जास्तीत जास्त सहा प्रश्न सोडवावेत अशी अपेक्षा असल्याने मला फर्स्ट क्लासची आशा होती. सर्व पेपरांत पहिला डायनॅमिक्सचा पेपर सर्वांत अवघड होता असे बहुतेकांचे मत झाले. तो पेपर सेट करणारे होते लंडनच्या किंग्स कॉलेजमधले खगोलशास्त्रातले प्राध्यापक हरमान बॉण्डी. त्यांनी एक प्रश्न स्वत:च्या संशोधनावरील प्रबंधातून काढून दिला होता असे मला नंतर कळले. पुढे एकदा त्या पेपरला उद्देशून लेडी जेफरीजनी बॉण्डी यांना ताणले होते त्याची माहिती त्यांनी गमतीत मला दिली. त्या म्हणाल्या, ''हरमान, तू विद्यार्थ्यांचा खाटकाप्रमाणे खात्मा केलास!''

जून १८ हा निकालाचा दिवस. तोपर्यंतचा काळ विविध करमणुकींद्वारे काळज्यांना थारा न देण्याचा आमचा प्रयत्न होता. आमचा कंपू होता मी, कुमार, जमाल आणि नरेश. आम्ही सर्व पार्ट दोनच्या परीक्षेसाठी बसलो होतो. पण आता आम्ही पार्ट तीनकडे दृष्टी टाकून पुढल्या वर्षी कुठले विषय घ्यावेत यावर फॅकल्टीचे मार्गदर्शन घेत होतो. पार्ट तीनसाठी जवळ जवळ साठ कोर्सेस होते, ज्यांतून आम्ही कमीत कमी सहा निवडायचे होते. याचे अंकगणित थोडक्यात असे होते : पार्ट तीनमध्ये सहा पेपर सोडवायचे होते. प्रत्येकाने एका पेपरात तीन प्रश्न सोडवायचे. आणि प्रत्येक चोवीस लेक्चर्सच्या कोर्सवर तीन प्रश्न असत. कुठल्याही कोर्सचा प्रत्येक पेपरात एकाहून जास्त प्रश्न नसे. अशीही शक्यता असे की, तुम्ही निवडलेल्या सहा कोर्सेसपैकी कशाचेच पुरेसे–म्हणजे तीन प्रश्न एका पेपरात येऊ शकले नाहीत. ही संभाव्यता कमी करायला सहांपेक्षा जास्त, आठनऊ कोर्सेस घेणे जरुरी असे. मला स्वत:ला फ्रेड हॉएल यांचे पुस्तक *फ्रंटिअर्स ऑफ ॲस्ट्रॉनामी* वाचून खगोलविज्ञानाशी संबंधित विषय घ्यावेसे वाटत होते. याशिवाय मी एडिंग्टन्, जीन्स, चंद्रशेखर यांची पुस्तके चाळली-वाचली होती व त्यांतून केंब्रिजच्या खगोल-परंपरेकडे मी आकर्षित झालो होतो. ह्या सर्वांचा विचार मनाशी ठेवून मी पुढील वर्षांसाठी आठ विषय निवडले.

करमणुकीकरता मी 'मे रेसेस'ना एक दिवस जाऊन आलो. एक दिवशी नरेशचंदने आम्हां सर्वांना चहापानासाठी बोलावले आणि खास, अनपेक्षित आकर्षण म्हणून हापूस आंबे समोर ठेवले. दोन वर्षांनी मी आंबा खात होतो आणि त्यातही जातिवंत हापूस! ह्याच दिवसांत माझा पाय पूर्णपणे प्लास्टरमुक्त होईल ह्या आशेने मी हॉस्पिटलला ठरल्या दिवशी गेलो. पण हाय! हाय! डॉक्टर म्हणाले, ''आज नाही–आणखी चार आठवड्यांनी–नक्की!'' अजून मला धीर धरणे भाग होते!

जून महिन्यातल्या दुसऱ्या रविवारनंतर येणारा गुरुवार म्हणजे १८ जून. आज विद्यापीठाच्या नियमानुसार ट्रायपॉस पार्ट दोन गणित परीक्षेचा निकाल सकाळी नऊ वाजता सिनेट हाउसच्या आतल्या बाल्कनीतून वाचला जाणार. धडधडत्या हृदयाने मी नऊला दहा मिनिटे असताना नियोजित स्थळी पोचलो. काही विद्यार्थी आधीच येऊन थांबले होते व काही अजून येत होते. नऊला एकदोन मिनिटे असताना परीक्षक-समितीचे अध्यक्ष डॉक्टर जे० डब्ल्यू० एस० कासल्स हे गाउन आणि मॉर्टर बोर्ड घालून बाल्कनीत उभे राहिले. नऊला शेजारच्या युनिव्हर्सिटी चर्च (ग्रेट सेंट मेरीची) घंटा नवाचे ठोके देऊ लागली. ते पूर्ण झाल्यावर त्यांनी टोपी काढून अभिवादन करून निकालपत्राचे वाचन सुरू केले.

रंगीत तालीम म्हणून गेल्या वर्षी मी ह्या समारंभात हजेरी लावली होती. पण तेव्हात आणि आत्तामध्ये जमीन-अस्मानाचा फरक होता : तेव्हा मी तटस्थ होतो, आता माझे नाव योग्य सूचीत वाचले जाईल का, ह्या काळजीत होतो. पहिली सूची रँग्लर्सची. अकारविल्हे. माझ्या आधी चंद्र, चित्रे व इस्लाम यायला पाहिजेत–पण ती नावे आली नाहीत–तसे माझे अवसान गळू लागले. लवकरच 'एन' अक्षर आले आणि परीक्षकांनी नाव घेतले–नार्लीकर, जे० व्ही०, फिट्झविलियम! चित्रेने मूक राहून हस्तांदोलन केले–माझे रँग्लर झाल्यावरचे पहिले अभिनंदन!

गेल्या वर्षीप्रमाणे मी तिथून पोस्टऑफिस गाठले, सेंट ॲण्ड्र्यूज स्ट्रीटमधले, फास्ट केबल रेट वापरून, फक्त एकशब्दी संदेश वसंतमामांना पाठवला : 'रँग्लर'. गेल्या वर्षीचाच तारमास्तर होता. केबलवरील संदेश वाचून त्याने अभिनंदन केले. गेल्या वर्षीप्रमाणे माझे आईवडील पुण्यात होते. त्यांना माझा संदेश त्या संध्याकाळी किंवा रात्री मिळणार. तसा तो मिळाला आणि दुसऱ्या दिवशी त्यांची अभिनंदनाची तार पण मला मिळाली. आपला मुलगा रँग्लर झाला याचा विशेष अभिमान तात्यासाहेबांना झाला असणार!

पण ही केवळ सुरुवात समजायची असे मी स्वत:ला बजावले. ह्या आनंदाच्या क्षणी, कृतकृत्य वाटत असतानाही वसंतमामांचे शब्द आठवत होते : ''रँग्लर होणं ही करियरची उत्तमच सुरुवात आहे. तो एक पाया समजायचा, ज्यावर तुझं संशोधन तुला उभं करावं लागेल. तिथंच तुझी खरी कसोटी लागेल!''

आता मला पार्ट तीन पूर्ण करायचा होता. तो विशेष प्रावीण्यासह यशस्वी केला तर पुढे संशोधनाची सुरुवात.

आज रँग्लर झालेले बरेचसे विद्यार्थी शिक्षणक्षेत्र, उद्योगसमूह, बँकिंग आदींकडे वळतील. एक-तृतीयांश संशोधनाकडे जातील.– माझी दिशा तीच...मनुष्याणां सहस्रषु कश्चिद्यतति सिद्धये! ⁘